# उप वनसंरक्षक, ठाणे वन विभाग यांचे कार्यालय

मॅरेथॉन सर्कल, लाल बहादूर शास्त्री मार्ग, नौपाडा, ठाणे-400 602, ☎२५४२१३७३.

Email : dycfthane@mahaforest.gov.in


पत्र

विषय : Diversion of 18.1824 ha. forest land in favour of MMRDA, Mumbai for construction of link road between Thane-Belapur road to N.H.-4 including tunnel through Parsik hill, Tal. & Dist. Thane. FP/MH/Road/17303/2015

जा.क्र. कक्ष-१/२०/जमीन ९२५ /२०१८-१९

ठाणे – ४००६०२ दिनांक : ०८ एप्रिल, २०१८

प्रति,

कार्यकारी अभियंता,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

संदर्भ : १) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक एफसी-II/एमएच-७६/२०१८-एनजीपी/३४५१, दिनांक २६.०३.२०१८

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१७/नोडल /आरएस-II/आयडी-१२५४०(६१)/३२११, दिनांक २७.०३.२०१८

विषयांकित प्रस्तावांतर्गत १८.१८२४ हे. वनक्षेत्र वळते करण्यास केंद्र शासनाचे संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये काही अटींवर तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. केंद्र शासनाचे तत्वत: मंजूरी पत्रातील अटींची खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात यावी.

अट क्रमांक ३ व ६ — प्रकल्पांतर्गत पर्यायी वनीकरणासाठी मौजे दहिवडी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट क्रमांक ४२५ मधील १८.५० हेक्टर वनेत्तर सरकारी जमीन प्रस्तावित केले आहे. पर्यायी वनीकरणासाठी Ready Recknor मधील मॉडेल -५ नुसार सन २०१८-१९ चा दर रु.९,५९,२४८/- प्रति हेक्टर ६२५ रोपांसाठी याप्रमाणे ०१ रोपासाठी १५३५ प्रमाणे १८५०० रोपांसाठी रक्कम रु. २,८३,९७,५००/- चा भरणा e-payment portal द्वारे Ad-Hoc CAMPA कडे करावा. याशिवाय पर्यायी वनीकरण क्षेत्राचे सभोवार सिमेंट बुरुज उभारणे, सिमांकन व सर्वेक्षण या कामासाठी लागणारी रक्कम रु. ९९,३२४/- चा भरणा e-payment portal द्वारे Ad-Hoc CAMPA कडे करावा. तसेच उपरोक्त कामासाठी लागणा-या खर्चाच्या रक्कमेत वाढ झाल्यास सदरची वाढीव रक्कम भरणेस तयार असल्याचे हमी पत्र सादर करावे.

अट क्रमांक ४ — प्रस्तावांतर्गत पर्यायी वनीकरणासाठी केलेले वनेत्तर क्षेत्र वनविभागाचे नावे करुन विधिवत मान्यतेपूर्वी वनविभागाकडे हस्तांतरीत करण्यात यावे व त्याप्रमाणे हमीपत्र सादर करावे.

अट क्रमांक ७ — प्रस्तावांतर्गत वळते होणाऱ्या १८.१८२४ हेक्टर क्षेत्राच्या नक्त वर्तमान मुल्याची रक्कम रु. १,३२,७३,१५२/- या रक्कमेचा भरणा e-payment portal द्वारे Ad-hoc CAMPA कडे करण्यात यावा.

अट क्रमांक ८ प्रस्तावांतर्गत वळते होणा-या १८.१८२४ हे. क्षेत्राचे नक्त वर्तमान मुल्याच्या रक्कमेत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार वाढ झाल्यास वाढीव रक्कम भरणा करणेस तयार असलेबाबत हमी पत्र सादर करावे.

अट क्रमांक २० प्रस्तावांतर्गत मान्य करण्यांत आलेले १८.१८२४ हेक्टर वळतीकरण वनक्षेत्रात पर्यावरण अनुकूल पक्षांचे घरटे लावण्यासाठी प्रति हेक्टर रक्कम रु. ६६००/- या दराने एकूण रक्कम रु.१,२०,००४/- या रक्कमेचा भरणा e-payment portal द्वारे Ad-hoc CAMPA कडे करण्यात यावा. तसेच वनक्षेत्रात पर्यावरण अनुकूल पक्षांचे घरटे लावण्यासाठी येणा-या खर्चाच्या रक्कमेत वाढ झाल्यास वाढीव रक्कम भरण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याचे हमीपत्र सादर करावे.

अट क्रमांक २२ प्रस्तावांतर्गत Muck disposal plan providing qualitative & quantative details चा पूर्तता अहवाल सादर करावा.

अट क्रमांक २४ प्रस्तावांतर्गत समाविष्ट बोगद्याचे दोन्ही मुखापाशी तसेच उड्डाण पुलाखाली वन्यप्राणी प्रवेश होणार नाही यादृष्टीने सुरक्षिततेसाठी जरूरी उपाययोजनेबाबत सविस्तर तपशिल सादर करावा. व त्याअनुषंगाने हमीपत्र जोडण्यात यावे.

अट क्रमांक २९ प्रकल्प यंत्रणेने वनविभागाचे सल्ल्याने मृद संधारणाची कामे करण्यासाठी योजना तयार करुन सादर करावे व मृद संधारणाची कामे प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने करण्यास तयार असलेबाबतचे हमीपत्र सादर करावे.

प्रस्तावांतर्गत बाधित होणा-या वृक्षतोडीकरीता सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,२८,०८०/- चा भरणा आवश्यकता आहे. तरी सदर रक्कमेचा भरणा Deputy Conservator of Forests Thane यांचे नावे धनार्कषाद्वारे करावा.

तसेच तत्वत: मंजूरीच्या पत्रातील अट क्र. i, iii,iv,vi,viii, x, xi, xii, xiii, ivx, xv, xvi, xvii, xviii, xx,xxi, xxiii, xxiv, xxv, xxvi,xxvii, xxviii,xxix, xxx,xxxi, xxxiii, xxxiv मध्ये नमूद केल्यानूसार कार्यवाही करण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याबाबतचे हमीपत्र (undertaking) या आवश्यक कागदपत्रांसह प्रत्येकी ६ प्रतीत त्वरीत या कार्यालयास सादर करावा.

केंद्र शासनाची विधिवत मंजूरी (Stage II Clearance) प्राप्त झाल्याशिवाय प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात कामे करण्यात येऊ नये. जेणेकरुन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चे तरतूदींचा वनभंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वरील प्रमाणे पुर्तता तात्काळ करण्यात यावी जेणेकरुन या स्तरावरील पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(डॉ. जितेन्द्र रामगावकर)
उप वनसंरक्षक
ठाणे वन विभाग, ठाणे

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपी - विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी : सहाय्यक वनसंरक्षक (र.रा.प. व वन्यजीव) ठाणे यांचेकडे जरूरी कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत : वनक्षेत्रपाल ठाणे यांना माहितीसाठी रवाना.